# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ४.१०.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.११) इतिवृत्त**

मंगळवार दिनांक ४ ऑक्टोबर २००५ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशीनाथ हरिभाऊ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.४० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०२) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०३) श्री. जगीरदार अजेजमुख्तार अहमद
(०४) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०५) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०६) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०७) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१०) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(११) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१२) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : शहरात कर्णपुरा येथे नवरात्रीच्या काळात मोठी यात्रा भरते. शहरातील व शहरा बाहेरील लाखो भाविक यात्रेत येत असतात. यात्रेच्या ठिकाणी मनपातर्फे पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी. पाण्याचे दोन टँकर उपलब्ध करून द्यावेत.टँकर उपलब्ध होत नसतील तर भाड्याने घ्यावेत. त्यास स्थायी समिती मान्यता देत आहे. बाबा पेट्रोल पंपजवळच्या रस्त्याचे काम करण्याच्या सूचना दिल्या होतया. फार थोडे काम झालेले आहे. तांत्रिक अडचणींमुळे झालेले नसेल. आता पाऊस उघडलेला आहे. काम करण्यात यावे. नवरात्रीच्या काळात शहरातील सर्व पथदिवे सुरू राहतील याची दक्षता घ्यावी. तसेच बौध्द लेणीवर विद्युत व्यवस्था व पाणी पुरवठ्याची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी.

श्री. मुजेब खान : मागच्या सभेत मी जकातीबद्दल प्रश्न विचारला होता. मला लेखी उत्तर मिळालेले आहे. संबंधीतावर कारवाई करावी. ३५ ते ४० दुकानांची तपासणी एका दिवसात एक व्यक्ती करते. लेखी उत्तरामध्ये चुक झाल्याचे मान्य करतात. मात्र कारवाई करण्यात येत नाही. मी मा.आयुक्तांना पत्र देत आहे.

मा. सभापती : सर्वांना व्यवस्थित माहिती द्यावी.

श्री.अजिजजहागिरदार : त्रृट्या काय आहेत ते आम्हाला कळवावे. आताच खुलासा करावा.

श्री.मुजेब खान : एमएच-२०-बी-७१०० क्रमांकाचे वाहन पकडले. १८ लाखांचे बिस्कीट, चॉकलेट, सिगारेट होते. ६५ हजर आकारणी केली. तीन दिवस गाडी मध्यवर्ती नाक्यावर होती. त्यांचेकडून दहापट दंड वसुल केला आहे का? पंचनामा केला

आहे का? खालच्या स्तरावरच सोडले असावे. वसुलीत गडबड झाली असावी असे वाटते. महानगरपालिकेची आर्थिक बाजू सुधारण्यासाठी या बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

मा. सभापती : स.सदस्यांनी वाहन क्रमांकासह माहिती दिलेली आहे. सदर प्रकरणात काय त्रुट्या आहेत, किती वसुली झाली इ. बाबत सर्व माहिती स.सदस्यांना द्यावी. उप आयुक्तांनी या प्रकरणात जतीने लक्ष घालावे. स.सदस्यांच्या जगरूकतेबद्दल अभिनंदन करण्यात येते.

श्री. विनायक पांडे : मागील चार दिवसांपासून सामना वृत्तपत्रात शिक्षण विभागासंबंधी बातमी येत आहे. यात शिक्षण विभागावर आरोप करण्यात येत आहे. मी जबाबदारीने वक्तव्य करतो की, शिक्षण विभागात गैरप्रकार होत असल्याची शंका आहे. शिक्षणाधिकारी पैशाची मागणी करतात. याबाबत चौकशी करावी.

श्री. रेणुकादास वैद्य : शिक्षणाधिकारी यांची प्रतिनियुक्तीची मुदत संपलेली आहे. त्यांना मुदतवाढ दिलेली आहे का?

श्री.अजिजजहागिरदार : बदल्याची संचिका मा.आयुक्तांनी मंजूर केलेली आहे. त्यांच्या बदल्या न करता मनमानी करण्यात येत आहे. मा.आयुक्तांनी मुळ संचिका पहावी. त्या मंजूर संचिकेत खाडाखोड करून दुसऱ्यांच्या बदल्या प्रस्तावित करण्यात येत आहेत.

सौ. लता दलाल : ही दहावी सभा आहे. फक्त एका सभेला शिक्षणाधिकारी हजर होते. स.सदस्य श्री.जहागिरदार यांनी आरोप केले, माझीही तीच मागणी आहे. मा.आयुक्तांनी मंजूर केलेल्या संचिकेत खाडाखोड करून शिक्षक व मुख्याध्यापकांच्या बदल्या केल्या. उप आयुक्तांनाही अंधारात ठेवले. ही बाब गंभीरतेने घ्यावी. त्यांची प्रतिनियुक्तीची मुदत संपल्यावर देखील प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे आलेला नाही. शाळा सुरू होऊन सहा महिने होत आहेत, अद्याप समायोजन नाही. मुदतवाढीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे का आलेला नाही? महानगरपालिकेच्या चित्रकला शिक्षकांना मुख्याध्यापकाची पदोन्नती दिली. क्रिडा शिक्षकांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती दिली नाही. शासनाचे आदेशानुसार क्रिडा शिक्षकांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती देता येते. फक्त चित्रकला शिक्षकांनाच पदोन्नती देण्यात आली.

श्री.दिलीप गायकवाड : सेन्ट फ्रान्सीस हायस्कूलजवळील ११६ दुकानांना टॅक्स लावलेला नाही.

उप आयुक्त (प्र) : शिक्षकांचे समायोजन बाबत संचिका मंजूर होऊन माझ्याकडेच आहे. आदेश पारीत झालेले नाहीत. शिक्षकांच्या बदल्याची संचिका आलेली आहे. मा.आयुक्तांशी चर्चा झाली असून या प्रकरणात आणखी जस्त छाननी करावयाची आहे. शिक्षणाधिकारी यांची मागील महिन्यात मुदत संपलेली आहे. वर्ग-१ चे अधिकारी द्यावे म्हणून शासनाकडे पत्र पाठविलेले आहे. नवीन शिक्षणाधिकारी येईपर्यंत मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवणार आहोत.

मा. सभापती : ज्यांच्या शिक्षण विभागा संबंधी ज्या ज्या अडचणी असतील ते सर्व लेखी स्वरूपात उप आयुक्त (प्र) यांचेकडे द्यावे.

श्री. मुजीब खान : मुलांच्या भविष्याचा प्रश्न आहे. महानगरपालिकेतील आरोग्य व शिक्षण हे दोन खाते मागेच आहे. या दोन विभागावर विशेष सभा घ्यावी. शाळांची पाहणी करावी. कटकट गेट जवळील शाळेची व्यथा आहे की एका खोलीत पाच-सहा शिक्षक,

दुसऱ्या खोलीत पाच-सहा शिक्षक असतात. मुख्याध्यापक कपडे दाखवतात. मुले बाहेर फिरतात. अशी शाळांची अवस्था आहे. शिक्षकांमध्ये गटबाजे जस्त झालेली आहे. जे जे स.सदस्य याबाबत काम करण्याची भावना ठेवतात व मदत करायला तयार आहेत त्यांना शाळा दत्तक देण्याबाबत विचार व्हावा.

सौ. लता दलाल : ८३ शाळा आहेत, शारीरिक शिक्षक मात्र आठ आहेत. केंद्राला एक-एक शारीरिक शिक्षक द्यावेत. ३३ केंद्र शाळांना आठ हे शारीरिक शिक्षकांचे प्रमाण पुरेसे नाही. त्यांची संख्या वाढवावी.

मा. सभापती : झोपडपट्टी भागात दाट लोकवस्ती असते व गरीब लोक राहतात. त्यांचे आर्थिक परिस्थितीमुळे त्यांची मुले मनपा शाळेत शिक्षण घेतात. सर्व सुविधा देऊन देखील शिक्षण व्यवस्थीत मिळत नाही. शिक्षण धोरण ठरविण्याची गरजआहे. ठाणे, मुंबई, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी स्वतंत्र शिक्षण मंडळ आहे. चांगली सुविधा उपलब्ध होऊ शकते. नवीन शिक्षण धोरण ठरवावे. प्रशासनाचे काय मत आहे? शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ नये. उप आयुक्त (प्र) यांनी नवीन शिक्षण धोरणाबाबत आयुक्तांसोबत बसून धोरण ठरवावे.

श्री. विनायक पांडे : आताच जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा झाल्या. त्यात मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविले. त्यांचेसाठी शिष्यवृत्ती असावी. आपल्या शहरातील कु.श्वेता जधव ही क्रिकेट खेळाडू नुकतीच आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकली आहे. मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिल्यास त्यातून असे खेळाडू निर्माण होऊ शकतील.

श्री. दिलीप गायकवाड: सेन्ट फ्रान्सीस जवळील ११६दुकानांना मालमत्ता कर का लावलेला नाही?

मा. सभापती : यापुर्वी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, डिमांड नोटीस गेल्या नसतील तर घरोघरी जऊन डिमांड नोटीसा त्वरीत द्याव्यात. मालमत्तांच्या नोंदी झालेल्या नसतील तर परवान्याची तारीख/विद्युत बिल हाही पुरावा नसेल तर इन्कम टॅक्स, सेल्स टॅक्स च्या पावत्या पाहून कर लावता येईल. आता माहिती असेल तर द्यावी नसता पुढील सभेत देण्यात यावी. कर्मचाऱ्यांना अडथळा निर्माण केल्याच्या पेपरला बातम्या आहेत. कर्मचाऱ्यांना दमदाटी करणे किंवा त्यांच्याशी वाद घालणे चुकीचे आहे. आपण वसुलीसाठी घेतलेल्या निर्णयाच्या पाठीशी ठामपणे राहावे.

श्री.मुजेब खान : मागील सभेत मोतीवाला फंक्शन हॉलबद्दल मी प्रश्न उपस्थित केला होता. उप आयक्त (म) हे जयमोक्यावर आले होते. या संदर्भात जुबेर मोतीवाला यांनी खुलासा केलेला आहे. त्यांच्याकडे ६ लाख ८० हजर टॅक्स बाकी आहे. मुख्य जलवाहिनीवरून पाण्याचे कनेक्शन घेतलेले आहे. शादीखान्याच्या बाजुला तीन इमारती आहेत. त्याला टॅक्स लागलेला नाही. शादीखान्याचे भाडे १२ घंट्याचे १० हजर रूपये घेतात. कमर्शियल टॅक्स लावावा. उप आयुक्तांना पत्र दिले होते. त्याचा खुलासा झालेला नाही.

मा. सभापती : मागच्या सभेत चार ठिकाणी स्थळपाहणीच्या सूचना केलेल्या होत्या. नगरसेवकांसह स्वत: मी ही पाहणी केली. सहाय्यक संचालक नगर रचना, उप आयुक्त (महसूल) संबंधीत कर्मचारी यांचेकडून माहिती घेतली व आवश्यक त्या सूचना दिल्या. मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे काय? नळ जेडणीची

काय स्थिती आहे? निवासी किंवा निवासेतर नियमाप्रमाणे मालमत्ता कर वसूल करावा.

श्री.दिलीप गायकवाड : दि.१९.१२.२००४ रोजी उप आयुक्तांनी अतिक्रमण काढावे म्हणून सूचना दिल्या होत्या. का काढले नाही?

मा. सभापती : दोन इमारती आहेत पैकी एका इमारतीवर स्थगिती आहे. स्थायी समितीच्या आदेशानंतर बांधकाम झालेले नाही.

श्री. मुजेब खान : परवा मोतीवाला फंक्शन हॉल संबंधी चौकशी झाली. त्यात अतिक्रमण असल्याचे दिसते. काय कार्यवाही केली? सदर ले-आऊट मध्ये माझे घर आहे. खुल्या जगेबद्दल विचारण्याचा मला अधिकार आहे. जनतेसाठी सुविधा असावी.

मा. सभापती : आपली सोसायटी आहे त्यात आपले घर आहे. सोसायटी जर जबाबदारी घेत असेल व त्यांच्याकडे निधी उपलब्ध असेल तर आपणास त्या जगेचा विकास करता येईल.

श्री.मुजेब खान : आम्ही विकास करतो परंतु १५% - १०% मध्ये पुन्हा ४ प्लॉट वाढविलेले आहेत. सदर प्लॉटचे सिटी सर्व्हे रेकॉर्डला कशी नोंद झाली? या बाबीकडे डोळेझाक केल्याचे वाटते. माहिती मिळाली नाही तर मी उपोषणास बसेल.

मा. सभापती : कुणाचीही गय केली जणार नाही.

श्री. मुजेब खान : आपण सर्वांनी पाहणी केली. मग खुलासा का देत नाही?

उप आयुक्त (म) : मागील स्थायी समितीच्या चर्चेप्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना, प्रशासकीय अधिकारी,मा.सभापती व स.सदस्य श्री.मुजेब आलमशाह खान यांच्या उपस्थितीत मोतीवाला फंक्शन हॉल भागाची पाहणी केली. खुल्या जगेच्या हद्दीप्रमाणे मोजमाप करण्यात आले. सदर ट्रस्टतर्फे ॲड.जुबेर मोतीवाला यांनी नगर भूमापन कार्यालयात दुरूस्ती झाल्याचे सांगितले. हॉललगत खुली जगा नसून मोतीवाला फंक्शन हॉलची जगा असल्याचे जुबेर मोतीवाला यांनी कागदपत्रे दिली आहेत. सदर कागदपत्रांची येत्या तीन-चार दिवसांत छाननी करून योग्य तो निर्णय घेतला जईल.

श्री.मुजेब खान : दिशाभूल होत आहे. महानगरपालिकेचे मंजूर रेखांकन आहे व रेखांकनातील खुली जगा आहे. ते अतिक्रमण आहे. कुणाच्या बोलण्यावरून थांबविल्या जते.

श्री.कंवरसिंग बैनाडे : स्वत: उप आयुक्त कबूल करतात याची खंत वाटते. दुसरीकडे आपण कोट्यावधी खर्च करून जगा खरेदी करतो. स.सदस्य म्हणतात नकाशे व पुरावे द्या. मग अधिकारी खुर्च्यावर का बसतात? वाव का देतात. प्रत्येक सभेला नकाशा द्या असे अधिकारी म्हणतात, मग अधिकारी काय काम करतात?

मा. आयुक्त : नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे संधी द्यावी लागते. तीन दिवसाची मुदत द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : आपण स्थळपाहणीसाठी जेव्हा जतो त्यावेळी आपले अभिलेख घेवून का जत नाही?

मा. आयुक्त : ३ दिवसाची मुदत लेखी स्वरूपात द्यावी. दोन दिवसात तपासावे.

श्री.मुजेब खान : संधी त्यांना द्यावी ज्याचे कागदपत्र नाही. १९८६ ला रेखांकन मंजूर झालेले आहे. दोन रेखांकन झाले होते. एक माझे व दुसरे त्यांचे. त्यांच्याकडे ६ लाख ८० हजर रूपये मालमत्ता कर बाकी आहे. नोटीस कधी देणार? मोतीवाला फंक्शन हॉल हा ट्रस्टचा आहे असे मोतीवाला पेपरमध्ये देतात. अनधिकृतपणे पाणी घेतात, बाजूला तीन इमारती आहेत त्याचाही मालमत्ता कर वसूल करावा.

सौ. लता दलाल : निराला बाजराचा हाच प्रश्न गेल्या सहा महिन्यांपासून मांडत आहे. उत्तर मिळत नसेल तर धरणे धरावे लागतील. नाला ही खुली जगा दाखवली असताना आपण काय कार्यवाही केली? पार्कींगबद्दल कारवाई केली होती त्यावेळेस अभिनंदन केले.

मा. सभापती : त्या परिसरातील तीन-चार ले-आऊट तसेच नाल्याचे सिमांकन, खुल्या जगेचे सिमांकन, नाल्यात ओपन स्पेस दाखवता येत नाही पण दाखवली. १५४३ लोकांना नोटीसेस दिल्या. त्याचा जस्त पाठपुरावा केला. अनेक वेळा चर्चा झाली परंतु कारवाई झाली नाही. दोन तीन दिवसात नोटीसा देण्यात याव्या. नियमाप्रमाणे कारवाई करा म्हणजे योग्य परिणाम दिसतील. प्रशासनाने सक्षमतेने कारवाई करावी.

सौ. लता दलाल : पैठणगेट येथील दुकान केंद्राच्या बाजुला शाळेचे बांधकाम तत्कालीन आयुक्त मा.शर्मा साहेब यांनी थांबवले. ठेकेदारास ९ लाखाचे बील दिले. काम अर्धवट आहे. त्या लगतकाही टपऱ्या भाड्याने दिलेल्या आहेत. मागच्या बैठकीत निलंबीत अभियंत्यांच्या बाबत दर्शविलेली कारणे पटण्यासारखी नाहीत. महाराष्ट्र शासनाने पत्र काढले की गुन्हा दाखल करा. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या खात्यातील अभियंत्यांना निलंबीत केले नाही. आपण मात्र निलंबीत करून गुन्हे दाखल केले. आमची मागणी आहे निलंबीतांना त्वरीत कामावर घ्यावे. किती दिवसात कार्यवाही करणार? सेवा भरती नियम आपण दुरूस्त करीत आहोत. त्यासाठी समिती केलेली आहे. यासंबंधी सूचना आहे की, समितीवर अधिकारी कर्मचारी ऐवजी त्या क्षेत्रातील निवृत्त अधिकारी नेमल्यास चांगले होईल. उप जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकाऱ्यांचा त्यात समावेश करावा.

श्री. शशांक विसपुते : नाथ प्रांगण येथील काम थांबवले. चौकशी समितीकडून अहवाल आला का? काम का चालू आहे?

श्री.मुजीब खान : मोतीवाला यांनी १५% चे १०% केलेले आहे. १०-१५% करण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे. आपण केल्यानंतर सिटी सर्व्हेवाले करतात. त्यांचे नंतर आपण करत नाही. दोन्ही ले-आऊट आम्ही केलेले आहे. त्यांना कुंपण भिंत होऊ दिली नाही. खुल्या जगेमध्ये मंडप टाकण्यासाठी सुध्दा तीन ते चार हजर रूपये घेतात. पत्रकारही आलेले होते, ते ही गोलमोल लिहितात. प्रेसवाले पावले उचलत नाही. अधिकारी मोबाईलवरून संबंधीतांना माहिती देतात. हे बरोबर नाही.

मा. सभापती : बैठकीत मोबाईलचा दुरूपयोग होऊ नये. सभेचे कामकाज चालू असताना मोबाईल सभागृहाच्या बाहेर ठेवावेत. ही बाब सर्व अधिकारी, कर्मचारी व सन्माननीय सदस्यांना लागू राहिल.

श्री.दिलीप गायकवाड : हॉटेल वेदांतचा दोन तृतियांश सामान्य कर कमी केला. यापुर्वी चार वेळेस दिलेले धनादेश वटलेले नाहीत. बाकीची रक्कम वसूल केली का, खुलासा करावा.

मा. सभापती : उप आयुक्तांनी वॉर्ड ऑफिसरला संचिका घेऊन बोलवावे. सर्वांना एकच नियम व अंमलबजवणीच्या सूचना द्याव्यात. दोन-तीन बाबीचा खुलासा करावा. सेवा भरती नियम भविष्यात सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना उपयोगी पडणार आहेत. शासनाचे नियमावलीचा अभ्यास करावा. विधानसभा नियमावलीमध्ये

लोकप्रतिनिधींचा सहभाग असतो. सर्व बाबींचा विचार करून त्वरीत पावले उचलावीत.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या जगा भाडेतत्वावर दिल्या त्याचे नुतनीकरण नाही. कायमस्वरूपी दिल्या का? परत घ्यावे किंवा नुतनीकरण करावे.

श्री. विनायक पांडे : सिध्दार्थ उद्यान येथील टपऱ्यांची किती वर्षात भाडेवाढ झालेली नाही?

मा. आयुक्त : सेवा भरती नियमासाठी एक कमिटी नेमली. एक एक कॅडर बघून विचार करून सूचना हरकती घेणार आहोत. सेवा भरती नियमाची कामे पूर्ण झाल्यावर जे या संदर्भात जणकार आहे, निवृत्त विभागीय आयुक्त किंवा इतर शासकीय अधिकारी यांचेकडून तपासणी करून घेऊ. आवश्यकता वाटली तर त्यांना किंवा एखाद्या तज्ज्ञ वकीलांना नियुक्त करून त्याचे प्रारूप तयार करून घेण्यात येईल. त्यावर सूचना हरकती मागवण्यात येतील. सूचना हरकतीवर सुनावणी देण्यात येईल. सर्व बाबींचा विचार करून स्थायी समिती व सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतरच राज्य शासनाकडे पाठविले जणार आहे. यात लोकप्रतिनिधींचा सहभाग असेलच. निलंबीत कनिष्ठ अभियंतावर फौजदारी स्वरूपाचे प्रकरण चालू आहे.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी शहराच्या विविध समस्यासंबंधी शहराची रचना, व इतर बाबीसंबंधी अभ्यास दौरा करून कालच परतले. त्यांच्या गैरहजेरीत निर्णय दिलेले आहेत. पाठीमागे काय निर्णय झालेले आहेत दोन तीन दिवस कालावधी लागेल. दौऱ्याविषयी माहिती दिली तर योग्य होईल.

मा. आयुक्त : सदर दौऱ्यात बऱ्याच बाबी शिकावयास मिळाल्या. मुख्य मुद्दा हा सस्टेनेबल सिटी प्रोग्राम (एस.सी.पी.) संबंधीचा आहे. एस.सी.पी.साठी औरंगाबादची निवड झाली. एससीपी चे दोन बाबी आहेत. शहराच्या गरज काय आहेत? चर्चा करून समस्यांचा शोध घ्यायचा व त्यानंतर सदर समस्यांची सोडवायच्या. चार शहरांचा दौरा करण्यात आला. चेन्नई, हैद्राबाद, कोलंबो आणि कॅन्डी(श्रीलंका) चारही शहरात घेवून गेले. काल मुंबईला बैठक झाली. राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियान आणि एस.सी.पी. या संदर्भात महानगरपालिकेने काय करावयास पाहिजे याबद्दल चर्चा झाली. हैद्राबाद शहरात एस.सी.पी. केल्यानंतर चांगली साफसफाई होते. झोपडपट्टी, स्वच्छता, आरोग्य यांना प्राधान्य दिले जते. स्वच्छतेचे खाजगीकरण करण्यात आलेले आहे. शहराला विविध युनिटमध्ये विभागून निविदा काढण्यात आल्या. ८% सुपरव्हीजन कॉस्ट खर्च निहाय निविदा नसते. लॉटरी पध्दतीने निविदा काढण्यात येतात. सहा महिन्यासाठी करतात. रात्रीचे वेळी साफसफाई केली जते व सकाळी ६ वाजेपुर्वी सर्व स्वच्छ होते. हैद्राबादमध्ये फारच चांगली स्वच्छता आहे. चांगले व्यवस्थापन आहे. भौगोलिक माहिती पध्दत (जी.आय.एस.) चांगली आहे. आणीबाणीच्या प्रसंगी नियंत्रणाची पध्दत चांगली आहे. संगणकाद्वारे सर्वांना एकाच वेळी संदेश पाठवतात. चेन्नई तेवढे स्वच्छ दिसत नाही. दहा भागापैकी सात भाग स्वच्छ दिसले नाही. रूपये १७०० प्रति टन कचरा उचलण्याचा खर्च येतो. खाजगीकरणाद्वारे ७०० रूपये प्रतिटन खर्च येतो. कचरा उचलण्याचे काम दिवसभर चालू असते. रात्रीची अट नाही. चेन्नईमध्ये चुक झालेली आहे की त्यांनी वजनावर दर ठरविले आहे. कधी कधी बांधकाम साहित्यामुळे ७५० रूपये प्रतिटन खर्च येतो. व स्वत: केले तर १७०० रूपये

प्रतिटन असा खर्च येतो. फ्रान्सची ओनीस कंपनी दहा पैकी तीन चेन्नईचे केले. त्यांना कमीत कमी २०० टन कचरा लागतो. चेन्नईला चांगले काम होते. घरोघरी जवून कचरा जमा करतात. कोलंबो येथे १००% खाजगीकरणातून होते व घरोघरी जवून कचरा उचलल्या जतो. चेन्नईला वेगवेगळ्या रंगाच्या कुंड्या ठेवलेल्या आहेत व ते कर्मचाऱ्यांना सांगतात की कचरा तुम्हीच विका. त्यामुळे कर्मचारी हे काम आवडीने करतात. त्यामुळे ते सुका व ओला कचरा वेगवेगळा करायला सांगतात. हैद्राबाद शहरात नाल्याचे पाणी लेकमध्ये जयचे. त्यांनी नाल्यात लहान लहान भिंती बांधून पावसाचे पाणी वळवून त्यावर प्रक्रीया करून ते लेकमध्ये आणले जते. चारपाच वर्षापुर्वी अशी परिस्थिती होती की, तेथे उभे राहणे देखील अवघड होते. हैद्राबाद शहरात १००% बी.ओ.टी.पध्दतीवर उद्यान विकसित झालेले आहे. उद्यानात चलचित्र दाखवतात. सदर दौऱ्यात अध्यक्ष व मुख्याधिकारी होते. घनकचरा व्यवस्थापन, वाहतुक, दळणवळण, कचऱ्यापासून विज निर्मिती याबद्दल माहिती घेतली. कचऱ्यापासून विज निर्मिती करण्यासाठी १००% बी.ओ.टी.पध्दतीवर आहे. त्यांना या ठिकाणी बोलावण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या दराने वीज घेता येईल. कोलंबो शहराची लोकसंख्या साडेसहा लाख आहे. सुका व ओला कचरा घरोघरी जवून जमा केला जतो. हैद्राबादला रात्रीचे वेळी साफसफाई होते. उड्डाण पुलाखाली कंपनी आपली जहिरात लावून तो भाग विकसित केला जतो. नाल्याचे पाणी १२ एम.एल.डी. लेकमध्ये व उरलेले उद्यानासाठी वापरले जते.

श्री. मुजेब खान : मा. आयुकतांनी माहिती दिली. हैद्राबाद शहरा संबंधी बरेच काही बोलले. स्थायी समितीचा अभ्यास दौरा हैद्रबादसाठी आयोजित करावा.

मा. सभापती : नगर सचिवांना सूचना करण्यात येते की, सध्या गुंठेवारीच्या सर्व्हेचे काम चालू आहे. नागपूर शहरात गुंठेवारीची अंमलबजवणी यशस्वीरित्या झालेली आहे. नागपूर, हैद्राबाद, चेन्नई अभ्यास दौरा केल्यास त्याचा उपयोग होईल. त्यात पत्रकारांचा देखील समावेश करावा व दौऱ्यांचे नियोजन करावे. मा. महापौरांच्या आदेशाप्रमाणे दौरा करावा.

श्री.मुजेब खान : गुंठेवारी संदर्भात शासनाचे आदेश काय, खुलासा करावा.

मा. सभापती : सर्व्हे नंबरसह माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे कामाकरीता ७ एजन्सीची नेमणूक करण्यास मान्यता दिलेली आहे. प्रत्येकी २०० घराचे काम विभागून दिलेले आहे. मंत्रीमंडळामध्ये रस्त्याच्या रूंदीबाबत आणि मालकी हक्काचे कागदपत्राबाबत सूचना दिलेल्या आहेत. ते लेखी स्वरूपात प्राप्त झालेले आहे का?

मा. आयुक्त : गुंठेवारी अंतर्गत जस्तीत जस्त ९ मीटर रूंदीचे रस्ते आहेत. ९ मीटरपेक्षा कमी रूंदीचे रस्ते हे विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे रस्त्याच्या लांबीनुसार ठेवता येतील. विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे ९ मीटरपेक्षा जस्त रूंदीचा रस्ता लागत असेल तरी कमीत कमी ९ मीटर आवश्यक आहे. मालकी हक्काचे पुराव्याची गरज नाही. कायदेशीर पुरावे असावे. १० रूपये, २० रूपये स्टॅम्प कागदावर करार झालेले आणि कायदेशीररित्या ताबा सिध्द होईल असे २००१ पुर्वी असलेल्या मिळकतींचा गुंठेवारीत समावेश होईल. एजन्सीमार्फत सर्वेक्षण करून फाईल दाखल करण्यात येतील. त्यानंतर शुल्क रक्कमेची आकारणी करून मागणी करण्यात येईल. रस्ते, गटार इत्यादीचे अंदाजपत्रके करणार. त्यांनीच

निविदा कागदपत्रे तयार करावीत. आम्ही फक्त त्यांना प्रसिध्द करू. एकाच वेळी सर्व कामे करण्यात यावी. आम्ही त्यांना कामे करण्यासाठी दबाव टाकणारच आहोत. ७ एजन्सीची नियुक्ती केली. २०० घरांच्या सर्वेक्षणाची गुणवत्ता तपासणी करून त्यांचे चांगले काम असेल तर याच दरामध्ये पुढे कामे देण्यात येतील.

श्री.शशांक विसपुते : एजन्सी मार्फत सर्व्हे होत आहे. दुसरीच व्यक्ती पैसे घेतील त्यांना ओळखपत्र देण्यात यावे.

मा. आयुक्त : सध्या कोणालाही पैसे देण्याची गरज नाही. सध्या खर्च महानगरपालिका करत आहे. आपण त्यांना ओळखपत्रे देऊ.

श्री.मुजीब खान : ऐतिहासिक तटभिंतीच्या आत-बाहेर जुने गांवाची हद्द आहे. त्यांना गुंठेवारी लागू करू नये. गुंठेवारीत कोणत्या वसाहती येतात, कोणत्या येत नाहीत याची माहिती होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : जेथे आखीव पत्रिका आहे ते जुने गावठाण आहे. स्लममध्ये मालकी नाही. गुंठेवारीत विकत घेतलेले असते. जुने गावठाण व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम अंमलात येण्यापुर्वीचे असेल व या बाबीत काही शंका निर्माण होत असेल तसे पत्र द्या. आम्ही यादी देऊ व माहिती कळवू.

मा. सभापती : गावठाण संदर्भात गुंठेवारीची काही तक्रार असेल तर उप आयुक्त (म) यांचेकडे लेखी स्वरूपात देण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींचा सर्व्हे चालू असल्याचे पत्र मिळाले. त्यात असे लिहिले की, आम्ही येवून संपर्क साधावा.

मा. आयुक्त : जे भाग झोपडपट्टीचा आहे त्या ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींचा सर्व्हे करण्याची जस्त गरज आहे. या ठिकाणी असे जस्त लोक असण्याची शक्यता आहे. म्हणून घरोघरी सर्व्हे करण्यात येत आहे. उर्वरीत भागामध्ये झोपडपट्टी किंवा राहिलेल्यांनी अर्ज करावेत. याबद्दल जहीर सूचना काढण्यात येईल. जे अर्ज प्राप्त होतील त्यांचेकडे जवून तपासणी करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : माझ्या वॉर्डातील प्रत्येक अपार्टमेंटमध्ये असलेले वॉचमन दारिद्र्य रेषेखाली येतात. स्लममध्येच राहावे असे काही नाही. हे लोक जहीर प्रगटन वाचत नाहीत व आपला कर्मचारीही पोहोचत नाही. जे सर्व्हे करतो त्यांनी नगरसेवकांना भेटावे. त्यांना अर्ज कसे करावे याची देखील माहिती नसते. ते अशिक्षित आहेत. एक पर्यवेक्षक आमच्या सोबत देण्यात यावा. आम्ही त्यांचेसोबत जऊन सर्व्हे करू व एक दिवसात त्यांना मुक्त करू.

मा. आयुक्त : १५ ऑक्टोबर पर्यंत सर्व्हेची मुदत आहे. त्यानंतर राहिलेल्या लोकांनी अर्ज करावेत.

श्री. मुजीब खान : कालच वॉर्ड कमिटीच्या सभेमध्ये चर्चा झाली. माझ्या वॉर्डात एकही स्लम नाही म्हणून सर्व्हे झाला नाही, हे योग्य नाही. सर्व्हे करण्याची सूचना द्यावी.

श्री.अज्जिजहागिरदार : माझा पूर्ण वॉर्ड स्लम आहे. अर्ध्या भागाचे सर्वेक्षण सुटलेले आहे. आणि आता पत्र पाठवले की, अर्जकरावेत.

मा. सभापती : महाराष्ट्र शासनाचे धोरणाप्रमाणे कालावधीत काम झाले नाही. स.सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, जे दारिद्र्य रेषेखाली येत असेल अशा प्रत्येक नागरीकाचा सर्व्हे झाला पाहिजे त्यांचेवर अन्याय होऊ नये. स.सदस्यांनी ज्या वसाहतीचे नांव

सांगितले त्याचा सर्व्हे करण्यात यावा. या संदर्भात किती अर्जआले त्याचा लेखी खुलासा करावा.

मा. आयुक्त : ही अत्यंत गंभीर बाब आहे. सर्व्हेतून कुणीही राहू नये. स्लम भागामध्ये १००% सर्व्हे होणार. जे भाग घोषीत झोपडपट्टी नसेल, यादीत नसेल त्यांची नांवे सुचवावीत. त्यांचा सर्व्हे करण्यात येईल व राहिलेल्यांकडून अर्ज मागविण्यात येतील.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी सविस्तर खुलासा केला. दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. झोपडपट्टीमध्ये कर्मचरी सर्वेक्षण करत आहेत. आजपर्यंत घोषीत झोपडपट्ट्यांमध्ये किती सर्व्हे पूर्ण झाला, प्रकल्प विभागात सक्षम अधिकारी आहे का?

उप आयुक्त (प्र) : मा.स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानुसार मा.आयुक्तांनी वॉर्ड ऑफीसर व सुपरवायझर यांची बैठक घेतली त्यावेळेस ३५% काम झाले होते. २६.९.२००५ पर्यंत घोषीत झोपडपट्ट्या व इतर वसाहतंमध्ये ९०% सर्व्हे झाल्याचा अहवाल आहे. शासनाने एक महिना मुदत वाढवली.

मा. सभापती : मुदतीत का झाले नाही? जे सर्व्हे झाला त्या भागाचे नांव सांगावे. एखाद्या वसाहतीची तपासणी करून खात्री करून घेता येईल.

प्र. प्रकल्प संचालक : ५३ घोषीत झोपडपट्ट्या व ९४ अनधिकृत वसाहतीमध्ये दारिद्र्य रेषेखालील कमकुवत घटक चा वॉर्डनिहाय सर्व्हेसाठी १७ जुलै रोजी फॉर्म वाटप केले. ऑगस्ट पासून काम सुरू केलेले आहे. पुर्वी १ ते ८ झोन कार्यालयामध्ये काम सुरू होते. आता ६ वॉर्ड कार्यालयात काम करण्यात येत आहे. वॉर्ड ऑफिसर यांना क्षेत्रिय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांना पर्यवेक्षक आणि आरोग्य विभागातील आर.सी.एच. कर्मचारी आणि बालवाडी शिक्षीका यांना प्रगणकाचे काम देण्यात आलेले आहे. सरासरी नेमून दिलेली ९०% कामे झालेली आहेत.

श्री. मुजीब खान : माझ्या प्रभागात शहाबाजर, मकसूद कॉलनी, अण्णाभाऊ साठेनगर इत्यादी वसाहती आहेत. नगरसेवकांना फॉर्म द्या, आम्ही भरून देतो. चौकशीसाठी घरोघरी जऊन तपासणी करण्यात यावी.

श्री.अजिजजहागिरदार : राहूलनगर, सादतनगर भागातील सर्व्हे राहिलेला आहे. १८६४ बाकी आहेत ते कोणत्या वॉर्डातील आहेत?

मा. आयुक्त : ५३ घोषीत झोपडपट्ट्या व ९० अनधिकृत वसाहती मध्ये ४२ हजर संख्येपैकी ९०% झालेले आहे. उर्वरीत लोकांकडून अर्जमागवण्यात येत आहे. स्लम सारखे वाटत असेल तर त्या त्या भागाची नांवे दिल्यानंतर घरोघरी जऊन सर्व्हे करण्यात येईल. उर्वरीत लोकांचे अर्जमागविण्यात येतील.

सौ.लता दलाल : प्रगणक घरोघरी फिरले नाही. दोन प्रकारचे फॉर्म आहेत, फॉर्मची त्यांना पूर्ण माहिती नाही. एक फॉर्म भरला तर दुसरा सोडला. दोन नंबरचे फॉर्म भरायचे राहिले आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी माहिती घेतली नाही. ५०% सर्व्हेमध्ये गोंधळ होईल, चौकशी करावी.

मा. सभापती : दारिद्र्य रेषेखालील सर्व्हेबाबत चर्चा होत आहे. उप आयुक्त (प्र) यांना सूचना आहे की, त्यांनी आपल्या देखरेखीत काम करून घ्यावे. गोरगरीब जनतेवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. ५३ स्लम व ९० अनधिकृत वसाहतीमधून १००% सर्व्हे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून करावा. २१६ कर्मचारी,

२३ पर्यवेक्षक आहेत. प्रत्येक नगरसेवकाकडे तीन-तीन कर्मचारी एका दिवसासाठी द्यावेत. लोकप्रतिनिधींची तळमळ आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाकरीता मिळणाऱ्या शिधापत्रिकेवर सवलती मिळतात. कुणीही सर्व्हेतून सुटू नये अशा सर्वांच्या भावना आहेत.

श्री. मुजीब खान : वॉर्ड कार्यालयात विविध कामासाठी कर्मचारी फिरतात. ७० कोटींची अंदाजपत्रके करायची आहेत. अभियंते वसूलीसाठी फिरतात. २० ते २५ हजर रूपये त्यांना पगार असून ते फिरत आहेत. त्यांनी झोनमध्ये बसून अंदाजपत्रके तयार करावीत. विकास कामे कसे होतील? पुर्वी वसुलीसाठी जे कर्मचारी होते ते नुसते फिरत आहेत.

मा. आयुक्त : मागील वर्षी पाणी पुरवठ्यावर ३३ कोटी खर्च झाला, वसुली ११ कोटी झाली. यावर्षी ५० कोटीची मागणी असून वसुली ३५ कोटी व्हावी. अभियंत्यांनी पाणी पुरवठ्याचे वसुलीसाठी दिवसातून २ तास द्यावेत.

श्री. गजनन बारवाल : मनपाच्या आरोग्य केंद्रावर वैद्यकीय अधिकारी वेळेवर येत नाहीत. सकाळी १० वाजेपर्यंत कुणीही डॉक्टर फिरकत नाही. शाळेचे प्रांगण भाड्याने देण्यासाठी टाळाटाळ होत आहे. शिक्षणाधिकारी यांना पत्र दिले त्यांनी मुख्याध्यापकांना व मुख्याध्यापकांनी पुन्हा शिक्षणाधिकारी यांना पत्र दिले. असे १५ दिवस गेले. सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. कोकणवाडी रेल्वेस्टेशन रोडचे काम चालू आहे. जगा ताब्यात घ्यावी. लेखा परिक्षणा संदर्भात सामना पेपरला बातमी प्रसिध्द झाली. मुख्य लेखा परीक्षकांनी केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष होत आहे. गंभीर दखल कोण घेणार? यात अनेक कर्मचारी दोषी आहेत. खुलासा का घेत नाही.

श्री.दिलीप गायकवाड : हर्सुल तलाव भरला. त्या ठिकाणी अनेक लहान मुले पाण्यात खेळतात. १९९७ मध्ये मनपाने या ठिकाणी बंदोबस्त ठेवला होता. त्यावेळी एका मुलाला पाण्यात बुडताना वाचविले. पार्कींग व बोटींग व्यवस्था करावी.

श्री.मुजीब खान : त्या ठिकाणी बरीच गर्दी दिसते. वॉचमन किंवा गार्ड ठेवावा.

श्री.कंवरसिंग बैनाडे : त्या ठिकाणी धोक्याची सूचना देणारे फलक लावण्यात यावेत.

श्री.शशांक विसपुते : विद्युत पोलची सुरक्षीत उपाययोजना करावी. अनेक ठिकाणी कनेक्शन बॉक्स बाहेर उघडे वायर दिसत आहेत. स्पार्कींग होत असते. याची दखल घ्यावी.

मा. सभापती : सदर सूचनेची कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.) यांनी दखल घ्यावी. हर्सूल तलाव येथे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी धोक्याची सूचना देणारे फलक लावण्याची व्यवस्था करावी. बोटींग सध्या मनपातर्फे शक्य नाही. अर्थसंकल्पात तरतुद नाही. बी.ओ.टी. पध्दतीवर स्मृतिवन परिसरात प्राणी संग्रहालय स्थलांतरीत करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलावीत. स.सदस्या सौ.दलाल यांनी पैठणगेट येथील शाळेच्या अर्धवट बांधकामासंबंधी ९ लाख रूपये देयक दिल्याचा मुद्दा मांडला. त्याचा दुरूपयोग होऊ नये. शहर अभियंता विभागांतर्गत बांधकाम झालेले आहे. सदर जगा रस्त्याने बाधीत होते त्यामुळे स्थगित ठेवले. स्थायी समिती, सर्वसाधारण सभेत चर्चा झाली. शहर अभियंता व सहा.संचालक नगर रचना यांनी योग्य ती कार्यवाही करून इमारत बांधकामास चालना द्यावी. आजकाय परिस्थिती आहे ज्यांचेकडे माहिती असेल त्यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : सदर ठिकाणी शौचालय तोडून बांधकाम करावे असा ठराव मंजूर झाल्याने बांधकाम सुरू केले. नंतर लक्षात आले की, विकास योजना रस्त्याने बाधीत होते. म्हणून बंद केले. त्यानंतर रस्त्याच्या आखणीत फेरबदल करण्याचा कलम ३७ खाली कार्यवाही पूर्ण करून सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर प्रस्ताव शासनास पाठवलेला आहे. ठेकेदाराने जेवढे काम केले तेवढे पेमेंट केले. वरच्या कामाचे पेमेंट नाही. आर.सी.सी.फ्रेम स्ट्रक्चर मध्ये काम आहे. विटकाम करून उपयोगात आणता येईल. पुर्वी या ठिकाणी शाळा नव्हती.

मा. आयुक्त : ५०-६० हजर खर्च करून वापरता येत असेल तर विचार करण्यात यावा.

सौ. लता दलाल : रस्त्याने बाधीत किती क्षेत्र आहे? बरेच बांधकाम झालेले आहे. ९ लाख किती क्षेत्रासाठी दिले कलम ३७ ची कार्यवाही केव्हा करणार, किती टक्के बांधकाम झाले, दुरूस्ती करून उपयोगात येत असेल तर तशी कार्यवाही करावी.

मा. सभापती : रितसर जहीर निविदा काढून काम दिलेले आहे.

शहर अभियंता : पुढच्या सभेत माहिती देण्यात येईल.

मा. सभापती : स.सदस्यांना माहिती देण्यात यावी. शाळेचा वापर करता येईल का, तर ३७ खालील कार्यवाहीचा पाठपुरावा करावा. लेखा परीक्षणाबद्दल स.सदस्य श्री.बारवाल यांनी सूचना केलेली आहे. वार्षिक लेखा अहवालात सर्व विभागांचा लेखा परीक्षण अहवाल येत असे. १५ दिवसांपुर्वी सूचना केल्या आहेत की, एक एक विभागाचे स्वतंत्र लेखा परीक्षण करून प्रथम स्थायी समितीसमोर व नंतर सर्वसाधारण सभेसमोर ठेवावे. मी कालच लेखा परीक्षकांना बोलवून माझ्या दालनात बैठक घेतली. त्यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. लेखा परीक्षणाचे कामात कुणी सहकार्य केले नाही तर त्यांचे विरूध्द कारवाई करण्यात येईल. वैद्यकीय अधिकारी वेळेवर येत नाहीत. त्यांनी वेळेवर दवाखान्यात जवे. वेळेवर रूग्णांची तपासणी करावी.

उप आयुक्त (म) : लग्न समारंभासाठी क्रिडांगण देण्याबाबत शिक्षणाधिकारी यांना दुरध्वनीवरून स्पष्ट सूचना दिल्या. उप आयुक्त (म) स्तरावर दिरंगाई झालेली नाही.

श्री.गजनन बारवाल : सर्व बाबींचा पाठपुरावा करून देखील १५ दिवस एन.ओ.सी. मिळत नाही. सर्वसाधारण सभेचे आदेश झालेले आहेत. तरी टाळाटाळ होते. शिक्षणाधिकारी हेतुपुरस्सर टाळतात. मुख्याध्यापकांना गरज वाटत नाही. परत शिक्षणाधिकारी नंतर मालमत्ता अधिकारी. कामामध्ये एकसुत्रीपणा आणावा.

मा. सभापती : हे प्रकरण निकाली काढावे. विलंब होणार नाही याची काळजी घ्यावी.

**विषय क्र. ७५ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करत आहेत की, महानगरपालिकेतील विभागप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना कार्यालयीन दैनंदिन कामे करताना सर्व पदाधिकारी, अधिकारी व नागरीकांशी सतत संपर्क साधावा लागतो. याकरीता खालील विभागप्रमुख व अधिकारी यांना त्यांचे नांवासमोर नमुद केल्यानुसार मोबाई करीता ठराविक रक्कम प्रतिमाह देण्याकरीता मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

| अ.क्र. | विभाग प्रमुख/अधिकारी(पद) | मोबाईल करीता प्रतिमाह **देय रक्कम रूपये** |
|---|---|---|
| १ | अधिक्षक अभियंता | ७५०/- |
| २ | मुख्य लेखाधिकारी | ७५०/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | उप आयुक्त (प्रशासन) | ७५०/- |
| ४ | उप आयुक्त (महसूल) | ७५०/- |
| ५ | मुख्य लेखा परिक्षक | ७५०/- |
| ६ | करमुल्य निर्धारण अधिकारी | ७५०/- |
| ७ | अतिरिक्त शहर अभियंता | ७५०/- |
| ८ | कार्यकारी अभियंता (ड्रेनेज/विद्युत) | ७५०/- |
| ९ | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | ७५०/- |
| १० | सहाय्यक संचालक नगर रचना | ७५०/- |
| ११ | आरोग्य वैद्यकीय अधिकारी | ७५०/- |
| १२ | नगर सचिव | ७५०/- |
| १३ | प्रकल्प संचालक | ७५०/- |
| १४ | उप अभियंता (पाणी पुरवठा-१) | ७५०/- |
| १५ | उप अभियंता (पाणी पुरवठा-२) | ७५०/- |
| १६ | उप अभियंता (पाणी पुरवठा जयकवाडी-स्थळ) | ७५०/- |
| १७ | उप अभियंता (पाणी पुरवठा जयकवाडी-यांत्रिकी) | ७५०/- |
| १८ | उप अभियंता (विद्युत-१) | ७५०/- |
| १९ | उप अभियंता (विद्युत-२) | ७५०/- |
| २० | आयुक्तांचे स्वीय सहाय्यक | ७५०/- |
| २१ | सर्व वॉर्ड ऑफिसर व वॉर्ड इंजिनियर | ७५०/- |

उपरोक्त प्रतिमाह कायमस्वरूपी खर्चास मान्यता मिळणेस्तव ऐनवेळीचा प्रस्ताव दि.२४.८.२००५ च्या स्थायी समिती सभेत मंजुरीस्तव सादर केला असता, यावर सभेत चर्चा होऊन सदर प्रस्तावामध्ये सर्व उप अभियंता व सर्व कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता यांनाही मोबाईल करीता उपरोक्त प्रमाणे ठराविक रक्कम प्रतिमाह देण्याबाबत सुचविले आहे.

परंतु महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेता, महानगरपालिकेवर रू.५४,०००/- प्रतिमाह व रू.६,४८,०००/- प्रतिवर्ष जस्तीचा आर्थिक भार पडेल म्हणून मुळ प्रस्तावात नमुद केल्यानुसार उपरोक्त अ.क्र.१ ते २१ विभाग प्रमुख व इतर अधिकाऱ्यांना प्रतिमाह कायमस्वरूपी खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव फेरविचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.कंवरसिंग बैनाडे : माझ्याबरोबर स.सदस्यांना देखील सर्वात जस्त काम कनिष्ठ अभियंत्यांशी पडते. पाणी पुरवठा विभागाचे सर्व अभियंत्यांना द्यावेत.

श्री. रेणुकादास वैद्य : मागच्या वेळी जी नांवे नाहीत ती समाविष्ट करावीत असे सुचविले. विभाग प्रमुख, शाखा प्रमुख, उप अभियंता, कनिष्ठ अभियंता या पध्दतीने खर्च ठेवावा तसे प्रस्तावात का आले नाही?

श्री.गजनन बारवाल : सर्व उप अभियंत्यांना का घेतले नाही? सर्वांना ५००/- रूपये करावे.

मा. सभापती : स.सदस्यांच्या सूचना विचारात घेवून अधिक्षक अभियंता यांनी कामाची निकड लक्षात घेवून, वस्तुस्थितीचा विचार करून ज्यांना ज्यांना आवश्यकता आहे त्यांचा समावेश करून १० लाख खर्चाच्या मर्यादित खर्च राहील यास अधीन राहून मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सभागृहात झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेतील विभागप्रमुख व इतर अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजत सुलभता यावी यासाठी प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते २१ विभागप्रमुख व अधिकारी यांना त्यांचे नांवासमोर नमुद केल्यानुसार मोबाईल करीता ठराविक रक्कम प्रतिमाह देण्यास तसेच या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार शहर अभियंता यांनी प्राधान्यक्रम व निकड ठरवून इतर काही अधिकारी, अभियंत्यांना मोबाईल करीता ठराविक रक्कम प्रतिमाह देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. यासाठी वार्षिक र.रू.१०,००,०००/-पर्यंत खर्च मर्यादा निश्चित करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र ज.क्र.सीआर-१७८/औबाद/२००५-२६५३, दि.३०.७.२००४ (दि.३०.७.२००५ रोजी प्राप्त) नुसार आरोपी लोकसेवक श्री.सुभाष अंबादास व्यवहारे, लिपीक व श्री.सिध्दार्थ बाळकृष्ण आगळे, शिपाई, विभाग क्र.२ मनपा,औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीची सापळा केस प्रकरणी त्यांचे विरूध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. पत्रासोबत सदरच्या प्रकरणाच्या तपासाचे संपूर्ण कागदपत्रांच्या नकलांचा संच पाठविलेला आहे. सर्व कागदपत्रे बारकाईने तपासली आहेत. संबंधीत श्री.सुभाष व्यवहारे व श्री.सिध्दार्थ आगळे यांच्या विरूध्द न्यायालयात अभियोग लावण्यासाठी पुरेसा पुरावा दिसून येत आहे. सबब प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोपी लोकसेवक श्री.सुभाष अंबादास व्यवहारे, लिपीक व श्री.सिध्दार्थ बाळकृष्ण आगळे, शिपाई, विभाग क्र.२ मनपा,औरंगाबाद यांचे विरूध्दची लाचलुचपतीच्या सापळा केस प्रकरणी त्यांचे विरूध्द न्यायालयात अभियोग लावण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेकडे सन १९९६ मध्ये खरेदी केलेले ९ वर्षे जुने एकच जेसी.बी. मशीन आहे. जेसी.बी. मशीनचे आयुष्य ७ ते ८ वर्षाचे असते. सदरील जेसी.बी. आतापर्यंत जवळपास ४० हजर तास चालले असून जुने झाल्यामुळे वारंवार दुरूस्ती करून वापरावा लागतो. जेसी.बी. कडून प्रशासकीय विभागाची अतिक्रमणे तोडणे, मनपाच्या मोकळ्या जगा लेव्हलींग करणे, रोडवरील माती काढणे, कचऱ्याचे मोठे ढिगार उचलणे, मांडकी येथे जमा झालेला कचरा ढकलून रोड करून देणे, कचरा डेपोत फसलेली वाहने काढणे, पाणी पुरवठा लाईन फुटल्यास तेथे काम करणे, गार्डनची कामे, हर्सुल तळ्यातील माती काढून टिप्पर्स भरून देणे, डेब्रीस मटेरीयल भरून देणे, वॉर्ड अधिकारी व स.नगरसेवक ह्यांचे मागणी प्रमाणे वॉर्डातील स्वच्छतेची/लेव्हलींगची कामे करणे, अग्निशमन दलास मदत करणे इत्यादी अनेक कामे मागणी प्रमाणे करावी लागतात.

सध्या मांडकी येथील ट्रेंचींग ग्राऊंडवर खत कारखाना बंद असून तेथे शहरातून निघणारा रोजचा ३०० टन कचरा जमा होत आहे. कचऱ्याचे प्रचंड ढिगार जमले असून कचरा टाकण्यासाठी जगा नाही, त्यामुळे तेथे दिवसभर एक जेसी.बी.ची जरूरी आहे. पावसाळ्यामुळे तर दलदल झाली असून वाहने फसत आहेत. दररोज हा जेसी.बी. तेथे ठेवल्यास इतर कोणतीच कामे होणार नाहीत. म्हणून सध्या किरायाने जेसी.बी. मांडकी येथे कार्यरत ठेवून कामे करून घेत आहोत. परंतु मनपाचे स्वत:चे एक स्वतंत्र जेसी.बी. कचरा हााळणीसाठी अत्यंत जरूरी आहे. त्याकरीता एक नवीन जेसी.बी. खरेदी करणे जरूरी आहे. जेसी.बी. इंडिया लिमिटेड ह्या उत्पादक कंपनीच्या पुणे कार्यालयातून दोन प्रकारच्या मॉडेल्ससाठी कोटेशन प्राप्त झाले आहे. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

**अ) <u>३-डी एक्स मॉडेल.</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. बेसीक किंमत | | - | रूपये १५,७५,१२०.०० |
| २. एक्साईजड्युटी (१६.३२%) | - | रूपये | २,५७,०६०.०० |
| ३. सीएसटी/व्हॅट टॅक्स(१२.५%) | - | रूपये | २,२९,०२२.०० |
| ४. ट्रान्सपोर्ट | - | रूपये | ३०,०००.०० |
| | **एकूण रूपये..** | | **२०,९१,२०२.००** |
| ५. एन्ट्री टॅक्स | - | रूपये | २५,१६२.०० |
| | **एकूण रूपये..** | | **२१,१६,३६४.००** |

**ब) <u>जेसी.बी.३-डी सुपर मॉडेल.</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. बेसीक किंमत | | - | रूपये १७,१५,०००.०० |
| २. एक्साईजड्युटी (१६.३२%) | - | रूपये | २,७९,८८८.०० |
| ३. सीएसटी/व्हॅट टॅक्स(१२.५%) | - | रूपये | २,४९,३६१.०० |
| ४. ट्रान्सपोर्ट | - | रूपये | ३०,०००.०० |
| | **एकूण रूपये..** | | **२२,७४,२४९.००** |
| ५. एन्ट्री टॅक्स | - | रूपये | २७,०२९.०० |
| | **एकूण रूपये..** | | **२३,०१,२७८.००** |

जकात, आर.टी.ओ., इन्शुरन्सचा खर्च वेगळा लागेल. ऑक्ट्रॉय एक्झम्शन प्रमाणपत्र द्यावे लागेल. आर.टी.ओ., इन्शुरन्सचा खर्च ''वाहन विमा'' साठी ठेवलेल्या तरतुदीतून करता येईल. एन्ट्रीटॅक्स हा सेल्स टॅक्स डिपार्टमेंटमध्ये डायरेक्ट भरावा लागेल.

वरील पैकी जेसी.बी. ३ डी-सुपर मॉडेल हे जेसीबीचे सुधारीत मॉडेल असून तांत्रिकदृष्ट्या जस्ती ताकदीचे आहे व फोरव्हील ड्रायव्हींग आहे. त्यामुळे किंमत जस्त असली तरी लेटेस्ट मॉडेलचे जेसी.बी. खरेदी करण्यासाठी शिफारस आहे.

**<u>जेसी.बी. कंपनीच्या अटी खालील प्रमाणे आहेत.</u>**

१. परचेस ऑर्डर जेसीबी इंडिया लिमिटेड बालाघाट, हरियाना चे नांवे द्यावी लागेल.
२. अदायी, डी.डी.द्वारे १००% जेसी.बी. इंडिया लि. मुंबई येथे करावे लागेल.
३. परचेस ऑर्डर बरोबर पेमेंट केल्यास २५ ते ३० दिवसांत जेसीबी मिळेल.
४. एन्ट्रीटॅक्स, आर.टी.ओ. इन्शुरन्स, जकातचा खर्च मनपास करावा लागेल. जकातसाठी एक्झम्शन सर्टिफिकेट द्यावे लागेल.

घनकचरा हाताळणी करण्याच्या कामासाठी जेसी.बी. मशिनची अत्यंत आवश्यकता आहे. तरी **३ डी-सुपर मॉडेलसाठी** येणाऱ्या रूपये २३,०१,२७८/- च्या खर्चास व सदरील मशिन जेसी.बी. इंडिया लि. कडून खरेदी करण्यास मंजुरी मिळावी. सदरील खर्च नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणीसाठी ठेवलेल्या रूपये ४५० लक्ष च्या तरतुदीतून करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य : रोख अदायगी नंतर सवलत मिळते त्याचा फायदा घेता येईल का?

श्री.मुजेब खान : झोनमध्ये गाड्या किती आहेत, माहिती घ्यावी.

मा. सभापती : सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. अतिरिक्त शहर अभियंता यांनी आणखी सवलत मिळत असेल तर पहावे. कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा आढावा घ्यावा. देखभाल दुरूस्तीची कामे करावीत व संपूर्ण कचरा उचलला जईल याची काळजी घ्यावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घनकचरा हाताळणी करण्याच्या कामासाठी जेसी.बी. मशिनची आवश्यकता लक्षा घेता **जेसी.बी.३ डी-सुपर मॉडेल** मशिन मे.जेसी.बी. इंडिया लि. यांचेकडून प्रस्तावात नमुद केलेल्या अटी शर्तीस अधीन राहून खरेदी करण्यास व त्याकरीता लागणाऱ्या रक्कम रूपये २३,०१,२७८/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

मा.सभापती : वार्ड क्र.२, ९, ६०, व ९८ चे स.सदस्य सर्वश्री सिताराम सुरे, पुरूषोत्तम ठाकूर, सौ.जुहराबी नासेरखान व सौ.अनिता घोडेले या सन्माननीय सदस्यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वार्ड क्र.२, ९, ६०, व ९८ या प्रभागातील विविध कामासाठी लेखाशिर्ष बदलणे, आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.

| वार्ड क्र. | पृष्ठ क्र. -अ.क्र. | **कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद** | **नविन/सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद** | **रक्कम** |
|---|---|---|---|---|
| २ | १२२/१७ | **देखभाल दुरूस्ती** वार्ड क्र.२ अंतर्गत असलेल्या स्लम विभागातील विविध विकासाची कामे करणे- ११ लक्ष | **भांडवली कामे** वार्ड क्र.२ अंतर्गत असलेल्या स्लम विभागातील विविध विकासाची कामे करणे | **११ लक्ष** |
| ९ | १८४/१०० | बिल्डर्स सोसा.येथील जुनी अरसीसी लाईन काढून नवीन एसडब्ल्युजे लाईन टाकणे - ३.०० लक्ष | नंदनवन कॉलनीतील मुख्य रस्त्याचे साईड पंख्याचे खडीकरण करणे | **३.०० लक्ष** |
| ६० | १६६/९१ | वार्ड क्र.६० मध्ये नवीन जलवाहिनी टाकणे - ३.५० लक्ष | वार्ड क्र.६० मध्ये नवीन हातपंप (बोअर) बसविणे | **३.५० लक्ष** |
| | १७२/१२ | सिल्लेखाना ते समर्थनगर नवीन ड्रेनेजलाईन टाकणे - ३.०० लक्ष | वार्ड क्र.६० मध्ये विविध ठिकाणी कॉंक्रेटींग करणे | **३.०० लक्ष** |
| ९८ | १४३/५४ | प्रभाग क्र.९८ मधील अभिनंदन सोसायटी, आनंदविहार ते नाथपुरम खडीकरण व डांबरीकरण करणे - रू.४.०० लक्ष-**काम रद्द करणे** | वार्ड क्र.९८ अंतर्गत नक्षत्रवाडी, कांचनवाडी, विटखेडा परिसरात विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण, मजबुतीकरण तसेच पुनर्डांबरीकरण करणे. **(अ.क्र.५४ व ५५ ची एकत्रित तरतुद-४+१०=१४.०० लक्ष)** | **१४.०० लक्ष** |
| | १४३/५५ | प्रभाग क्र.९८ इटखेडा येथील २४ मीटर विकास योजना रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - १०.०० लक्ष- **काम रद्द करणे.** | | |
| ९८ | १९०/४१ | पैठणरोड ते विटखेडा गावापर्यंत विद्युत पथदिवे लावणे - १.०० लक्ष | विटखेडा भागात व परिसरात विविध ठिकाणी मर्क्युरी विद्युत फिटींग लावणे | **१.०० लक्ष** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | १९०/६ ४ | प्रभाग क्र.९८- १००% विकास खर्च भरलेल्या वसाहतीत विद्युत पथदिवे लावणे - ५.०० लक्ष | प्रभाग क्र.९८ मधील कांचनवाडी,विटखेडा, नक्षत्रवाडी(सर्व स्लम) मध्ये तसेच १००% विकास खर्च भरलेल्या सर्व भागात खांबासह विद्युत पथदिवे लावणे व मर्क्युरी फिटींग लावणे | **५.०० लक्ष** |

''राष्ट्रगीतानंतर''सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद